# बी एस पाटील महाविद्यालय, परतवाडा जि अमरावती
## वाणिज्य विभाग अहवाल
## सत्र 2018-19

सत्र 2018-19 मध्ये वाणिज्य विभागाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले होते. शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला विभागीय सभेचे आयोजन करण्यात आले व त्यामध्ये संपुर्ण वर्षाची रूपरेषा आखण्यात आली तसेच विविध प्राध्यापकांकडे विविध विषय अध्यापनाचे काम वाटप करण्यात आले. नवीन येणाऱ्या बीकॉम प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची Entry Level Exam घेण्यात आली. त्यातून विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता तपासण्यात आली व त्याच चाचणी परीक्षेच्या निकालावर त्या त्या विषयाचे slow learner व Advanced Learner निवडण्यात आले. त्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी तासिकांचे आयोजन करण्यात आले. वाणिज्य शाख्येला प्रवेशीत विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील परिसराची, त्यांना असलेल्या अभ्यासक्रमाची, सध्या जगामध्ये असलेल्या स्पर्ध्येची माहिती व्हावी या अनुषंगाने बीकॉम प्रथम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांचे उदबोधन वर्ग 02, 03,04 व 05 जुलै 2018 आयोजित केला. हा कार्यक्रम एकूण 04 दिवस घेतल्या गेला, त्यासाठी वाणिज्य शाख्येतील प्रा ए एस ढोके, प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी एक एक दिवस उदबोधन वर्गाला मार्गदर्शन केले. सोबतच वर्षभरामध्ये विद्यार्थांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने विषय शिक्षकांनी आपल्या विषयाचे ज्या पध्दतीने समजून सांगावयाचे आहे त्यासाठी विद्यार्थ्यांना कुठली पध्दत योग्य ठरेल यासाठी Brain Storming session चे आयोजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना सत्राच्या शेवटच्या टप्प्यात विषयाची कितपत ओळख झाली यासाठी surprise test घेण्यात आली व अभ्यास सविस्तर समजून त्याची मांडणी कशी करतात यासाठी Open Book test घेण्यात आली तर Question & Answer Session चे आयोजन करून विद्यार्थ्यांचा प्रतिसाद व समस्या लक्षात घेवून Problem Base Learning या सत्राचे आयोजन सुध्दा करण्यात आलेले होते सोबतच seminar व Group Discussion चे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर बीकॉम अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांकडून इ-कॉमर्स या विषयाशी निगडीत १२९ विद्यार्थ्याकडून प्रकल्प तयार करून घेण्यात आले तर एम कॉम च्या चवथ्या सेमीस्टर च्या विद्यार्थ्यांकडून विविध विषयांवर प्रकल्प तयार करून घेण्यात आले.यासोबतच वाणिज्य विभागाच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये दि. 22 ऑगस्ट 2018 रोजी वाणिज्य नियोजन मंडळाचे उदघाटन करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी उद्घाटन सोहळा उत्सहात पार पडला. ह्या मंडळाच्या माध्यमातून वर्षभर विविध विद्यार्थी हिताचे कार्यक्रम आयोजित केल्या जाता. वाणिज्य शाख्येतीलं विविध वर्गमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांमधून वर्गानुसार प्रतिनिधी नेमल्या

जातात व त्यातून एकाला मंडळाचा अध्यक्ष, एका उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, सचिव निवडल्या जाते, यासाठी सर्वांच्या सहमतीने ही प्रकिया पूर्ण केल्या जाते. या कार्यक्रमाचे आयोजन मुख्यता विद्यार्थ्यांच्या ह्या मंडळाच्या माध्यमातून केल्या जाते. 22 ऑगस्ट 2018 ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्यासाठी उद्घाटक म्हणून प्रा डॉ शिवचरण कोत्तेवार, सिपना महाविद्यालय, चिखलदरा याना आमंत्रित करण्यात आले होते तर ह्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ आर ए उमेकर होते. या कार्याक्रमाचे प्रास्ताविक प्रा ए एस ढोके यांनी केले तर प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा स्वप्नील भेंडे ह्यांनी केले.

वाणिज्य विभागाच्या वतीने दि. 30/08/2018 रोजी महाविद्यालयाच्या बाजुला असलेल्या मागास वस्तीमधील कुटुंबाच्या आर्थिक स्थितीचे सर्वेक्षण करण्याचे काम करण्यात आले. त्यामध्ये वस्तीमधील कुटुंबाच्या आर्थिक स्थितीची माहिती मिळविण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सर्वे आयोजित करण्यात आला होता.त्यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली त्यामध्ये त्यांचे वय, कुटुंबातील सदस्य संख्या, आर्थिक उत्पन्न स्त्रोत, मासिक उत्पन्न,कुटुंबातील कमाविणाऱ्यांची संख्या अशा स्वरूपाचे विविध प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. या सर्वेच्या माध्यमातून त्यांची खरी खुरी माहिती गोळा करून ज्या कुटुंबातील लहान मुले शाळेत जात नाही, ज्यांची मुले शिकविण्याची परिस्थिती नाही अशा मुलांची यादी करून महाविद्यालय चालवीत असलेले SALVE प्रोजेक्ट ला माहिती देणे. त्याचप्रमाणे ह्या वस्तीची सर्वेक्षणात मिळालेली माहिती संकलीत करून या मतदारसंघाचे आमदार श्री बच्चूभाऊ कडु यांच्याकडे योग्य उपाययोजना करण्याकरिता सादर करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ उमेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून यात प्रा ए एस ढोके,प्रा डॉ एन एन धोंडगे, प्रा शेळके, प्रा कु. अपराध्ये, प्रा कु वर्मा, प्रा भेंडे, प्रा कु अपेक्षा दुबे, प्रा कु विशाखा पाटील व विद्यार्थी यानी सहभाग घेतला. त्यानंतर वाणिज्य विभागामध्ये 14/09/2018 रोजी "समाज माध्यमांचे समाजावर होणारे परिणाम " या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रा सुरेश गवळी, जगदंबा महाविद्यालय, अचलपूर याना प्रमुख वक्ते म्हणून बोलावण्यात आले होते. आज जगामध्ये विविध समाज माध्यमे उपलब्ध आहेत त्यामध्ये टीव्ही, मोबाईल, फेसबुक, वाटस अप, ट्विटर, इन्स्टाग्राम इत्यादी आहेत. आज कोणतीही व कुठलीही गोष्ट, बातमी, घटना कधी व कोणत्याही वेळेला घडली तर ती सर्वत्र अगदी वाऱ्यासारखी पसरते. तसेच ह्या माध्यमांचा विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यसामध्ये उपयोग करून घेतला तर त्याचा खूप मोठा फायदा विद्यार्थ्यांना होवू शकतो पण याचे असंख्य दुष्परिणाम पण आहेत. याच अनुषंगाने समाज माध्यमांचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम समजण्यासाठी ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते व त्यादृष्टीने त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ आर ए उमेकर होते तर कार्याक्रमाचे प्रास्ताविक प्रा ए

एस ढोके यांनी केले तर प्रा डॉ शेळके यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा कु पूजा वासनकर ने केले.

वाणिज्य विभागाच्या वतीने "कौशल्य विकास" या विषयावर विद्यापीठ स्तरीय एक दिवसीय कार्यशाळा 03 जानेवारी 2019 ला आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांची जाणीव व्हावी, त्यांच्यामध्ये विविध कौशल्याबाबत माहिती व्हावी तसेच विविध विषय घेवून त्या त्या विषयांची कौशल्य विकसित करण्याच्या दुष्ट्रीने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उदघाटन प्रा डॉ दिनेश निचित,वाणिज्य अधिष्टाता,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती यांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख अतिथी प्रा डॉ सोनल चांडक, के एल महाविद्यालय,अमरावती ह्या होत्या तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर ए उमेकर होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी केले तर संचालन प्रा कु विशाखा पाटील ने केले. त्याचप्रमाणे कार्याशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये प्रा डॉ प्रसाद खानझोडे, लोकमान्य टिळक महाविद्यालय, अमरावती यांनी मार्गदर्शन केले तर त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा सुरेश गवळी, जगदंब महाविद्यालय, अचलपूर यांना स्वीकारले दुसऱ्या सत्रामध्ये व प्राचार्य डॉ अतकरे, कृषि महाविद्यालय, म्हसोना यांनी मार्गदर्शन केले तर या सत्राचे अध्यक्ष स्थान प्रा डॉ प्रशांत वैराळकर, जगदंब महाविद्यालय, अचलपूर यांनी स्वीकारले. या कार्यक्रमातील सर्वांचे आभार प्रा ए एस ढोके यांनी मानले.

त्यानंतर विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानात वाढ व्हावी यासाठी महाविद्यालय स्तरावर निःशुल्क M S Excel या विषयावर Certificate Course चे 02 जानेवारी 2019 ते 04 फेब्रुवारी 2019 या दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या course चा syllabus महाविद्यालयीन स्तरावर वाणिज्य विभागाच्या प्राध्यापकांनी तयार केलेला असून ह्या Course साठी महाविद्यालयातील 59 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यामध्ये B.COM -I , II , III तसेच B A - I, II , III इत्यादी वर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश होता. ह्या सर्व विद्यार्थ्यांचे वर्ग महाविद्यालयातील तासिका संपल्यानंतर घेण्यात येतात. या कोर्सच्या अध्यापनासाठी महाविद्यालयातील तासिका तत्वावर घेतलेले व ह्या विषयामध्ये पारंगत असलेले प्राध्यापकांची निवड करण्यात आली. ह्या कोर्सचा कालावधी 30 तासिकांचा होता व शेवटी संपूर्ण अभ्यासाक्रमावर आधारित परीक्षा घेण्यात आली व त्यांना ग्रेड पध्दतीने निकाल देण्यात आला तसेच त्यांना कोर्स पूर्ण केल्याचे Certificate देण्यात आले.

वाणिज्य विभाग, भगवंतराव शिवाजी पाटिल महाविद्यालय, परतवाडा द्वारा संत गाडगेबाबा, अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा नेमून दिलेल्या अभ्यासक्रमानुसार बी.कॉम भाग- 3 च्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगाला भेट द्यावी लागते व त्या आधारित एक संशोधन प्रकल्प तयार करावा लागतो. त्यातून विद्यार्थ्यांची विचार करण्याची वृत्ती वाढीस लागावी तसेच विविध विषयांवर प्रकल्प तयार करता यावे हा उद्देश ह्या उद्योग समूहाला भेट या संकल्पनेचा आहे. त्याच अनुषंगाने फिनले मिल कापड उद्योग,अचलपूर येथे दिनांक 08 फेब्रुवारी 2019 ला भेट देण्यासाठी गेलो होतो. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उद्योगाच्या कार्यपध्दतीचे निरीक्षण केले. तेथील व्यवस्थापकासोबत चर्चा करून उत्पादन व विक्री संबंधीत माहिती समजून घेतली. ह्या उद्योग भेट मध्ये प्रा ए एस ढोके, प्रा डॉ एन एन धोंडगे, प्रा शेळके ,प्रा भेंडे, प्रा कु.विशाखा पाटील, कु.अपेक्षा दुबे, प्रा कु. शर्मा इत्यादींनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी उद्योगाला भेट या विषयावर प्रकल्प तयार करून सबंधित विषयाच्या प्राध्यापकाकडे सादर केला. ह्या भेटी दरम्यान 129 विद्यार्थी उपस्थित होते.

विभागातील सर्व विषयाच्या शिक्षकांनी सेमिनारचे आयोकन केले त्यामध्ये सर्व विषयांचे विविध संकल्पना, चालू घडामोडी, धोरणात्मक विषय, पर्यावरण जनजागृती, व्यावसायिक प्रकल्प इत्यादी विषय देऊन 11,12,13 फेब्रुवारी 2019 ला faculty अंतर्गत seminar कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्फुर्तपणे, स्वच्छेने आनंदाने सहभाग घेतला तसेच seminar कसा द्यावा, त्यावर विद्यार्थ्यांनी कशा पद्धतीने प्रश्न विचारावेत याबाबत commerce faculty चे विभाग प्रमुख प्रा. ए एस ढोके यांनी सुरवातीलाच मार्गदर्शन केले. त्यानंतर Seminar आयोजनासाठी संबंधित विषयाच्या प्राध्यापकांनी आपल्या तासिकामध्ये seminar आयोजित केले. यामधून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे, त्यांनी विविध विषयाचे ज्ञान मिळणे हा प्रमुख उद्देश समोर ठेवण्यात आला.

वाणिज्य शाखेअंतर्गत दिनांक 18 व 19 फेब्रुवारी 2019 रोजी विविध विषयावर आधारित सर्वच वर्गाचे Group discussion संबंधित विषयाच्या तासिका मध्ये आयोजित करण्यात आले होते. सुरुवातीला Group Discussion म्हणजे काय, विषयावर सखोल चर्चा कशी करावी, प्रत्येक विषयाच्या दोन बाजू कशा असतात इत्यादी सम्पूर्ण बाबी विषयी माहिती प्रा. ए एस ढोके व प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर विविध वर्गामध्ये Group Discussion पार पाडण्यात आले, यातून विद्यार्थ्यांची जिज्ञासू वृत्ती वाढीस लागली, त्यांनतर कुठल्याही विषयांवर बोलता यावे यासाठीच ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

वाणिज्य विभागांतगर्त बी.कॉम च्या सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेमध्ये कुठल्याही स्वरूपाची अडचण जाणार नाही यासाठी प्रा ए एस ढोके व प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी 02 मार्च 2019 रोजी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामध्ये परीक्षा पध्दती, प्रश्नाची उत्तरे कशा पध्दतीने लिहावे, जास्तीत जास्त गुण मिळविण्यासाठी कोणती पध्दती वापरावी, वर्णनात्मक किंवा विश्लेषणात्मक प्रश्नाची उत्तरे कसे सोडवावी त्याचप्रमाणे लघुत्तरी प्रश्न व बहुपर्यायी प्रश्न सोडविताना घ्यावयाची काळजी या बाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये परीक्षे बाबत आत्मविश्वास निर्माण झाला व ते परीक्षेला न घाबरता सामोरे जातात.

वाणिज्य शाख्येच्या वतीने शिक्षण घेवून बाहेर जाणाऱ्या एम कॉम च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. विद्यार्थ्यांनी भविष्यामध्ये कशा पद्धतीने जीवन जगावे, त्यांनी मिळविलेल्या शिक्षणाचा आपल्या जीवनानात कसा उपयोग करावा या विषयी प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी विभागाला एक शिव छत्रपती यांची फ्रेम भेट दिली.

या वर्षी प्रा डॉ नंदकिशोर धोंडगे यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती कडून आचार्य पदवी मार्गदर्शक म्हणून मान्यता दिले आहे तसेच सत्रामध्ये एम.कॉम ची विद्यार्थांनी कु.हर्षाली वांगे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून तिसरी मेरीट आली.

**वाणिज्य विभाग**

**1) प्रा ए एस ढोके**

**2) प्रा डॉ एन एन धोंडगे**

अशोक एस.ढोके
सहयोगी प्राध्यापक व प्रमुख
वाणिज्य विभाग
दी एस पाटील महाविद्यालय
परतवाडा जि अमरावती